# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १२१-२३** **दिनांक :- १२/०४/२०२३**

## सोनसाखळी चोरी करणा-या सराईत अरोपीतास अटक करुन ७ गुन्हयांची उकल गुन्हे शाखा कक्ष-२, वसई यांची कामगिरी.

दिनांक १०/०२/२०२३ रोजी फिर्यादी नामे श्रीमती किरण अशोक मगिया, वय ६२ वर्षे, रा. रो हाऊस नं.५, शक्ती विलाज, हुसेन कॉलनी, बंगली रोड, वसई प. हया त्यांचे सुनेबरोबर स्कुटीवरुन त्यांचे राहते घरातुन जैन मंदिर, वसई प. या ठिकाणी कार्यक्रमासाठी जात असताना पहाटे ०६.०० वा. चे सुमारास शाओमी एम.आय.चे शोरुम समोर, माणिकपुर नाका वसई प येथे आल्या असता त्यांचे पाठीमागील बाजुने एक दुचाकी मोटार सायकल स्वार त्यांचे स्कुटीच्या डाव्या बाजुने त्यांचे जवळ आला व मोटार सायकलवर पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीयांचे गळ्याजवळ हात मारुन त्यांची सोन्याची चैन जबरीने खेचुन बाईकने अंबाडी सिग्नलकडे भरधाव वेगाने निघून गेल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं I ४६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ अन्वये दिनांक १०/०२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या चैन स्नॅचिंग गुन्हयांना आळा घालणेबाबत व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी घडणा-या प्रत्येक चैन स्नॅचिंग गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परिक्षण केले होते. चैन स्नॅचिंग गुन्हयातील आरोपीत याचे फुटेज परिक्षण व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त महितीच्या अधारे आरोपीत नामे अब्बास अमजद ईराणी, वय २४ वर्षे, रा. फातिमा मंजील, भास्कर शाळेचे समोर आंबिवली ,पाटील नगर ता. कल्याण, जिल्हा ठाणे यास निष्पन्न करुन सदर आरोपीत हा आंबिवली ईराणी वस्तीतील रहीवासी असल्याने वरीष्ठांच्या आदेश व मार्गदर्शनाने आंबिवली ईराणी वस्तीमध्ये नमुद आरोपीत याचे दैनंदिन दिनक्रमाबाबत माहिती घेवून यापुर्वी ईराणी वस्तीमध्ये आरोपीत पकडणेस गेलेल्या तपास पथकावर हल्ला होण्याच्या ब-याच घटना घडलेल्या असतानाही सर्व बाबींची योग्य सांगड घालुन सापळा करवाई करुन कोणताही कायदा व सुव्यवस्थेची प्रश्न निर्माण होणारी कोणतीही घटना न घडु देता सदर आरोपीतास दिनांक ०४/०४/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले व नमुद अटक आरोपीत याचेकडुन तपासादरम्यान चैन स्नॅचिंगचे ७ गुन्हे उघडकीस आणुन वर नमुद गुन्हयात चोरी करणेकरीता वापरलेल्या मोटार सायकल सहीत गुन्हयात चोरीस गेलेले ८७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ०३,३१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### -: उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ४६/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं २०/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. १७७/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ४. | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. २८३/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ५. | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ३१३/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ६. | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं ३९/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |
| ७. | नालासोपारा पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ०४/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे |

## -:अटक आरोपीची पार्श्वभूमी :-

नमुद अटक आरोपीत याचे विरोधात संघटीत गुन्हेगारीचे (MCOCA) २ गुन्हे, जबरी चोरीसह दुखापतीचे २१ गंभीर गुन्हे ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २, वसई युनीटचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, मंगेश चव्हाण, संजय किसन नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा नेमणुकीतील पो.हवा. बापु पवार, राजेश पद्मने, महेंद्र शेट्ये तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी केली आहे.



-----ooooo----